ISSN: 2348-3083
SJIF 2016 : 4.44
UGC APPROVED SR. NO. 48612
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय शिक्षणात वृत्तपत्रांची भूमिका

**डॉ.कुऱ्हाडे शुभांगी सूर्यकांत**

असि.प्राध्यापकअध्यापक महाविद्यालयअरण्येश्वर,पुणे-९

**Abstract**

*स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर आज राष्ट्रीय शिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे.लोकमान्यांच्या शब्दात सांगायचे तर आजचे शिक्षण म्हणजे पदव्यांचे हमालखाने झाले आहेत.या शिक्षणातून असंख्य कारकून निर्माण केले जात असून कितीतरी हातांची कौशल्ये निकामी होताहेत. अशा वेळी राष्ट्रीय शिक्षण या मुलभूत संकल्पनेचा विचार करण्याची गरज आहे.सत्याचा शोध घेण्यास व सर्वोच्च जीवनविकास साधण्यास शिक्षणच साहाय्यभूत होऊ शकते.त्याद्वारेच शरीर,भावना,बुद्धी,व्यावसायिक कौशल्य व जीवनमूल्ये यांचा विकास होतो. आधुनिक जीवनाच्या गरजा व आकांक्षा यांच्याशी शिक्षणाचा मेळ बसला,तरच आव्हाने पेलण्यास राष्ट्र समर्थ बनते.ही उद्दिष्टे लक्षात घेऊन राष्ट्रीय शिक्षणाची आखणी करणे आवश्यक आहे.अनेक वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आपली भूमिका निभावली.जुन्या वृत्तपत्रांपैकी कलकत्याहून निघणारे ''बंगाली'' व 'अमृतबजार पत्रिका' मद्रासहून 'हिंदू' व टिळकांचे 'मराठा'ही वृत्तपत्रे१९०५ ते १९२० या काळात आघाडीवर होती.त्या काळच्या ॲंग्लो-इंडियन वृत्तपत्रांचा अपवाद वगळता,भारतीय वृत्तपत्रांनी अत्यंत मोलाची कामगिरी बजावली.सर्वसामान्य जनतेला राष्ट्राच्या सर्वच क्षेत्रातील बातम्या पुरविण्याचे कार्य तर त्यांनी केलेच,परंतु त्याच बरोबर परकीय सत्ताधिशांकडून होणारा अन्याय,जुलूम व शोषण याबद्दल जनमत जागृत करून राष्ट्रवादाची भावना दृढ करण्याचे व लोकमत साकार करून सामान्य जनतेला स्वातंत्र्याकरिता चाललेल्या आंदोलनात सहभागी होण्यास उद्युक्त करण्याचे बहुमोलाचे कार्य वृत्तपत्रांनी केले.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**- शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे.त्यात स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्राचे ध्येय,संकल्प व त्याचा प्रत्यक्ष आचार यातील अंतर कमी करणे हा राष्ट्रीय शिक्षणाचा प्रमुख कार्यक्रम होता.लोकमान्य टिळक, आगरकर आणि त्यांचे सहकारी राष्ट्रीय शिक्षणाचे प्रवर्तक मानले जातात. राष्ट्राचा सांस्कृतिकइतिहास ज्या महापुरूषांनी म्हणजे आध्यात्मिक संतमुनींनी,राष्ट्रवीरांनी,

समाजसुधारकांनी घडविला,त्यांचे जीवनदर्शन,राष्ट्रीय समस्यांची जाणीव व राष्ट्रीय कर्तव्याची जागृती हे विषय शिक्षण पद्धतीत प्रभावीपणे समाविष्ट केले पाहिजेत.स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजी शिक्षणाची जी एक समर्थ वैचारिक पिढी निर्माण झाली तिने निर्भयपणे स्वराज्याचा मूलमंत्र दिला.आणि जनतेला स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी करून घेतले. स्वराज्याबरोबर राष्ट्रीय अस्मिता आली.राष्ट्रीय जाणीव हा शिक्षणाचा गाभा होता.त्यामुळे स्वराज्याच्या चतु:सूत्रीत राष्ट्रीय शिक्षणास बहुमोल व अग्रस्थान होते.

---

➢ **राष्टीय शिक्षण संकल्पना –** सत्याचा शोध घेण्यास व सर्वोच्च जीवनविकास साधण्यास शिक्षणच साहाय्यभूत होऊ शकते.त्याद्वारेच शरीर,भावना,बुद्धी,व्यावसायिक कौशल्य व जीवनमूल्ये यांचा विकास होतो. आधुनिक जीवनाच्या गरजा व आकांक्षा यांच्याशी शिक्षणाचा मेळ बसला,तरच आव्हाने पेलण्यास राष्ट्र समर्थ बनते.ही उद्दिष्टे लक्षात घेऊन राष्ट्रीय शिक्षणाची आखणी करणे आवश्यक आहे.मुख्यत: राष्ट्र ही केवळ राजकीय संकल्पना नसून त्या भौगोलिक मर्यादांच्या देशातील सर्व लोकांच्या जीवनमूल्यांचे ते प्रतीक आणि संरक्षक आहे.या भूमिकेतूनच राष्ट्रीय उद्दिष्ट साकार होईल.धर्मधिष्ठीत,वंशधिष्ठीत वा हुकूमशाही पक्षाधिष्ठीत राष्ट्रवाद ही राष्ट्रवादाची विकृती आहे.म्हणून विश्वबंधूत्वाचा,मानवतेच्या वा विश्व कुटुंबाच्या दिशेने प्रभावी होणारे राष्ट्रीयत्व हेच राष्ट्रीय शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

‘‘ देशाची तरूण पिढी राजकीय,औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास आणि ते उत्तरोत्तर वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारचे शिक्षण म्हणजेच राष्ट्रीय शिक्षण.’’इ.सन १९०६ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात ‘राष्ट्राच्या गरजेप्रमाणे,राष्ट्रीय पद्धतीनुरूप व राष्ट्रीय नियंत्रणाखाली दिले जाईल ते राष्ट्रीय शिक्षण.’ अशी राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या करण्यात आली.त्यानंतर पश्चिम बंगालमध्ये अनेक माध्यमिक शाळा नव्याने सुरू झाल्या.

- ‘‘राष्ट्रपुरूषांची सर्व तऱ्हेने उन्नती करणारे आणि राष्ट्रीयत्वाची ओळख करून देणारे ते राष्ट्रीय शिक्षण.’’
- ‘‘ राष्ट्राबद्दल–स्वदेशाबद्दल प्रीती उत्पन्न करणे हे राष्ट्रीय शिक्षण होय.’’

महात्मा जोतीराव फुले यांनी समाजाला शिक्षण देण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आणि त्या दिशेने इ.सन १८४८ पासून प्रत्यक्ष कार्यही सुरू केले.त्याला त्यावेळी राष्ट्रीय शिक्षण असे विशेषण लावले गेले

नसले,तरी राष्ट्र या संज्ञेत सर्व जातीजमातींचा समावेश होणे अगत्याचे असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाची गरज राष्ट्रीय शिक्षणाचाच एक भाग होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजी शिक्षणाने जी एक समर्थ वैचारिक पिढी निर्माण झाली तिने निर्भयपणे स्वराज्याचा मूलमंत्र दिला.सामान्य जनतेला स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी करूनघेतले.स्वराज्याबरोबर राष्ट्रीय अस्मिता आली.सहबंधुत्वाची भावना रूजली.जो तो मन लावून आपापले काम नेटाने करू लागला.कारण राष्ट्रीय जाणीव हा शिक्षणाचा महत्वाचा गाभा होता.त्यामुळे स्वराजाच्या चतु:सूत्रीत राष्ट्रीय शिक्षणास बहुमोल व अग्रस्थान होते.

स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर आज राष्ट्रीय शिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. लोकमान्यांच्या शब्दात सांगायचे तर आजचे शिक्षण म्हणजे पदव्यांचे हमालखाने झाले आहेत.या शिक्षणातून असंख्य कारकून निर्माण केले जात असून कितीतरी हातांची कौशल्ये निकामी होताहेत. अशा वेळी राष्ट्रीय शिक्षण या मुलभूत संकल्पनेचा विचार करण्याची गरज आहे.

- **शिक्षणाद्वारा देशहिताचे संस्कार–**

१) राष्ट्र या कल्पनेबरोबरच राष्ट्राभिमान,राष्ट्रीयत्त्व या संकल्पना उदयास आल्या.लोक सुशिक्षित,कार्यक्षम व देशावर नितांत प्रेम करून राष्ट्रासाठी सर्वस्व देण्यास तयार असायला हवेत.महाराष्ट्रात १८४८ मध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी समाजाला शिक्षण देण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.त्यावेळी राष्ट्रीय शिक्षण असे विशेषण लावले गेले नसले,तरी राष्ट्र या संज्ञेत सर्व जातीजमातींचा समावेश होणे अगत्याचे असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाची गरज राष्ट्रीय शिक्षणाचाच एक भाग होती.

२) राष्ट्राच्या प्रगतीत समाजाच्या सर्व थरांतील लोकांच्या शिक्षणाचा समावेश करण्याचा विचार व तत्संबंधी कृती यांनी व्यापक अर्थाने राष्ट्रीय शिक्षणच म्हणावे लागेल.

३) भारतात उच्च शिक्षण घेतलेले काही तरूण इंग्रज सरकारच्या नोकरीत दाखल झाले.इंग्रजांपेक्षा भारतीय कमी नाहीत,या प्रखर जाणिवेने राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक सुधारणा याबद्दलच्या विचारांना चालना मिळाली.

४) विष्णूशास्त्री चिपळूणकर,लोकमान्य टिळक,गोपाळ गणेश आगरकर यांच्या प्रयत्नांमुळे १८८० मध्ये ‘न्यु इंग्लिश स्कूल’ची स्थापना झाली.राष्ट्रीय शिक्षणातून अस्मिता जागृत करणे आणि त्यासाठी मातृभाषेचा वापर करणे यावर त्यांचा भर होता.

## ➢ लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय शिक्षणाबाबचे मत–

लोकमान्य टिळकांच्या मते राष्ट्रीय इमारतीचे स्वराज्य,स्वदेशी,बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे चार खांब आहेत आणि राष्ट्रीय इमारतीच्य मजबुतीसाठी हे चारही खांब मजबूत असणे आवश्यक आहे.राष्ट्रीय शिक्षणाची समर्पक व्याख्या लोकमान्य टिळकांनी केली आहे.ते म्हणतात,''एक राज्य,एक भाषा एक समाज यांना व्यापून समाजहित साधणारी वृत्ती जपून जे समाजास सतत एकात्म राखते ते राष्ट्रीय शिक्षण.'' एके ठिकाणी ते म्हणतात,''राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचे ते एवढ्याकरिता की मुलांच्या मनात राष्ट्राशिवाय प्रथम दुसरी कोणतीही गोष्ट येऊ नये.''

२७ फेब्रुवारी १९०८ रोजी सोलापूर येथील श्रीसिद्धेस्वराच्या देवळासमोरील पटांगणात लो.टिळकांचे राष्ट्रीय शिक्षण या विषयावर व्याख्यान झाले. त्यात व्याख्यानाच्या सुरूवातीलाच ते म्हणतात,'' आपण कोण, आपली स्थिती काय आहे,पुढच्या पिढीने काय करावे,पोट कसे भरावे,देशाची कामगिरी काय आहे,याची ओळख करून देणारे शिक्षण हेच राष्ट्रीय शिक्षण होय.''प्रत्येक व्यक्तीचे चारित्र्य चांगले असले पाहिजे. ' मी राष्ट्राकरिता मरण्यासदेखील तयार आहे' अशी बुद्धी राष्ट्रातील तरूणांत उत्पन्न झाली पाहिजे.हे ज्या शिक्षणाने होईल ते राष्ट्रीय शिक्षण.''असे सांगून लोकमान्य टिळक राष्ट्रीय शिक्षणाचा हेतू 'आम्हाला करारी देशभक्त तयार करावयाचे आहेत' असा सांगतात.राष्ट्रीय शिक्षणाचा सर्वात महत्वाचा मुलभूत घटक म्हणजे 'मी' पणाला विसर्जित करणे.'मी'पणामुळे प्रादेशिकतेच्या संकुचितवादाला खतपाणी मिळते.राष्ट्र सर्वश्रेष्ठ आहे.यात मी म्हणजे राष्ट्राचा सेवक या अर्थाने प्रत्येक व्यक्तिने विचारात घ्यावे.

## ➢ राष्ट्रीय शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका–

१) राष्ट्रीय शिक्षणासाठी राष्टीय उत्सवांचे आयोजन सुव्यवस्थित करून त्याची यथायोग्य जाणीव विद्यार्थ्यास दिली पाहिजे.

२) राष्ट्रीय उत्सवाद्वारा समाज संघटित होऊन राष्ट्रातल्या विधायक शक्तींना उभारी द्यायला हवी.

३) राष्ट्रीय महापुरूष हे केवळ कोणत्याही एका जातीचे नसतात,ते आखिल मानव समाजाचे असतात म्हणून त्यांच्या राष्ट्रीय जीवनाची व्याप्ती विद्यार्थ्यांना जर आपण समजावून सांगितली तर त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची वृत्ती वाढीस लागेल.

४) राष्ट्रीय संगीताचा अंतर्भाव राष्ट्रीय शिक्षणात करायला हवा.विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रीय कविता ठसविण्यासाठी त्याच्यात सजग वृत्ती आधीच तयार करून घ्यावी.

५) राष्ट्रीय विचार पक्केपणाने रूजविण्यासाठी त्याच्याकडून राष्ट्रीय ग्रंथमालेचे पद्धतशीरपणे वाचन करून घेतले पाहिजे.

६) विविध अभ्यासपूर्ण व्याख्याने आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणता येईल.राष्ट्रीय शिक्षणाचे मूळ अधिष्ठान तत्वज्ञान,संस्कृती व धर्म ही आहेत.यांचा विचार केला तरच राष्ट्रीयता वाढीस लागेल.

## ➢ वृत्तपत्रांची भूमिका–

➢ ब्रिटीशपूर्व काळातही भारतात बातमीदार व बातमीपत्रे अस्तित्त्वात होती.परंतु वृत्तव्यवसायाचा खर श्रीगणेशा १७८० साली हिकी याने सुरू केलेल्या 'बंगाल गॅझेट' या वृत्तपत्राने झाला.त्याच सुमारास 'द कलकत्ता गॅझेट' 'द इंडियन वर्ल्ड' ही वृत्तपत्रे भारतात निघू लागली.सरकारी नीतीवर टीका केल्याबद्दल,कॉर्नवॉलिसच्या काळात 'द इंडियन वर्ल्ड' चा संपादक व सर जॉन शोअरच्या काळात'द टेलिग्राफ' चा संपादक यांना सरकारी दंडनीतीचे प्रहार सोसावे लागले.

➢ लॉर्ड हेस्टिंग्जची वृत्तपत्रविषयक नीती बरीच उदार असल्याने १८१८ च्या सुमारास 'समाचारदर्पण','संवादकौमुदी','द कलकत्ता जर्नल'यांसारखी काही नवी वृत्तपत्रे व नियतकालिके सुरू झाली.वृत्तपत्रांना मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे काही वृत्तपत्रांतील लिखाणही बरेचसे निर्भीड होऊ लागले.सरकारी सेवेतील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांवर टीकेचे प्रहार होऊ लागले.त्याबरोबर,त्या टीकेमुळे सरकारच्या स्थैर्याला धोका निर्माण होईल की काय अशी धास्ती वाटून सरकारने १८२३ मध्ये वृत्तपत्रांबाबत नियम तयार केले.

➢ द्वारकानाथ टागोर यासारख्या नामवंत भारतीय नेत्याने त्याकाळी त्या नियमाविरूद्ध उघडपणे निषेध नोंदविला होता.नंतरच्या काळात,वृत्तपत्र स्वातंत्र्यावर विश्वास असलेल्या चार्लस मेटकाफने ३ ऑगस्ट १८३५ रोजी १८२३ चा तो नियम रद्द करून वृत्तपत्रांवरील ते नियंत्रण रद्द केले.मेटकाफने दिलेल्या त्या वृत्तपत्र स्वातंत्र्याचे एकमुखाने व उत्साहाने स्वागत भारतीयांनी केले.

➢ १८५७ च्या उठावाच्या वेळी वृत्तपत्रांसंबंधीची ती उदार सरकारी भूमिका टिकली नाही.उठावाचा भडका होताच,१८५७ मध्ये सरकारने ''लायसन्सिंग ॲक्ट''पास केला.प्रत्येक वृत्तपत्राकरिता सरकारी अनुज्ञापत्र सक्तीचे करण्यात आले;व ते अनुज्ञापत्र वृत्तपत्राकरिता द्यावयाचे की नाही हे ठरवायचा

अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला.राजकीय व सामाजिक प्रश्नांबाबत जागृती घडवून आणून देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा जनमनात रूजविण्याच्या दृष्टीने देशी भाषिक वृत्तपत्रांनी मोलाची कामगिरी बजावली;तर याउलट १८५८ नंतर इंग्रज लोकांनी संपादित केलेल्या वृत्तपत्रांची भूमिका भारतीय जनतेच्या आकांक्षाप्रती सहानुभूतीशून्य होती.एवढेच नव्हे तर ब्रिटीश सरकारला त्यांचा उघड पाठिंबा होता.भारतीयांनी ब्रिटीशांविरूद्ध केलेल्या उठावाच्या कटू स्मृती इंग्रजांच्या मनात अजून ताज्या होत्या हे एक त्याचे मुख्य कारण होतेच.पण त्याशिवायही एक महत्वाचे कारण म्हणजे १८५८ नंतर भारताचे स्वामित्त्व ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटीश राजसत्तेकडे गेले होते व त्या राजसत्तेशी इंग्रजांची निष्ठेची बांधिलकी होती.

बंगालमध्ये त्याकाळी आघाडीवर असलेले वृत्तपत्र म्हणजे''हिंदू पेट्रियट''. १८५७ च्या उठावाचे खरे स्वरूप जनतेपुढे स्पष्टपणे मांडणे,नीळ बागाईतदारांच्या जुलमी नीतीवर प्रखर टीका करणे,त्या मजुरांच्या हालअपेष्टा व दैन्य यांना वाचा फोडून,त्यांच्या जुलुमी मालकांविरूद्ध निष्क्रिय प्रतिकाराला त्यांना उद्युक्त करणे अशा स्वरूपाचे कार्य त्या वृत्तपत्राने चालविले होते.बंगालमध्ये त्या वृत्तपत्राला त्याकाळी मानाचे स्थान प्राप्त झाले होते.

- १८६० ते १८८० या दोन दशकात वृत्तपत्रांच्या झालेल्या वेगवान विकासाला अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या.राजकीय प्रश्नांची खुली चर्चा करण्याचे वृत्तपत्रे हे एक प्रमुख साधन होते.त्यामुळे १८६१ चा सुधारणा कायदा पास झाल्यानंतर त्यावर व अन्य राजकीय समस्यांवर,राष्ट्रात होत असलेल्या जनजागृतीमुळे साधकबाधक चर्चा व्हावी हे स्वाभाविकच होते.त्यामुळे वृत्तपत्रांना चालना मिळाली.
- १८६० नंतरच्या दशकातील वृत्तपत्रे ज्ञान व माहिती प्रसारित करण्याचे प्रमुख कर्तव्य तर पार पाडीत होतीच,परंतु त्याच बरोबर त्यांचे स्वरूप प्रामुख्याने राजकीय व राष्ट्रवादी होते.राजकीय प्रश्नांवर भर देणारे बंगालमधील पहिले वृत्तपत्र म्हणजे द्वारकानाथ विद्याभूषण यांनी चालविलेले 'सोमप्रकाश'.
- बंकिमचंद्र चॅटर्जी यांचे बंगदर्शन हे मासिक व अक्षयचंद्र सरकार संपादित संध्याराणी हे साप्ताहिक यांनी राष्ट्रवादाचा प्रसार व राजकीय जागृती याबाबत मोलाची कामगिरी केली.
- १८६८ मध्ये साप्ताहिक म्हणून निघणारे 'अमृतबझार पत्रिका'हे राष्ट्रवादाच्या प्रसाराचे कार्य सातत्याने करणारे त्याकाळचे एक प्रमुख व प्रभावी वृत्तपत्र होते.ब्रिटीश शासनातील उणीवा,दोष व प्रतिगामी सरकारी नीती निर्भयपणे स्पष्ट करणारे,इंग्रज अधिकाऱ्यांच्या दुष्ट कृत्यांना वाचा फोडणारे व राजकीय

प्रश्नांची राष्ट्रवादी दृष्टीकोनातून सडेतोडपणे चर्चा करणारे ते वृत्तपत्र प्रारंभापासूनच अत्यंत लोकप्रिय ठरले.

- १८७८ मध्ये लॉर्ड लिटनच्या ''व्हरनॅक्युलर प्रेस अॅक्ट''च्या दंडुक्यापासून सुटका करून घेण्याकरिता,तो कायदा पासा झाल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीपासून 'अमृतबझार पत्रिका' इंग्रजी भाषेतून काढण्यात येऊ लागले.१८९१ पर्यंत साप्ताहिक म्हणून निघणारे हे वृत्तपत्र'संमती वया'च्या विधेयकावरून वादळ उठताच १९ फेब्रुवारी १८९१ पासून एक दैनिक बनले.प्रखर राष्ट्रवाद व निर्भीड लिखाण यामुळे एक नवचैतन्य अमृतबझार पत्रिकेने बंगालच्या वृत्तपत्रव्यवसायात निर्माण केले.'भारतीय स्वातंत्र्याच्या कार्यात या वृत्तपत्राइतके महत्वाचे योगदान अन्य कोणत्याही वृत्तपत्राने केले नसेल'अशा शब्दात पत्रिकेच्या कार्याचा गौरव 'समाचार चंद्रिका' च्या १८ जानेवारी १८७२ च्या अंकाने केला होता.
- ४ जानेवारी १८८१ मध्ये अनुक्रमे 'मराठा'हे इंग्रजी भाषिक साप्ताहिक व 'केसरी' हे मराठी दैनिक टिळकांनी आगरकर,चिपळूनकर व नामजोशी यांच्या सहकार्याने सुरू केले.काही काळ आगरकरांनी केसरी तर प्रो.केळकरांनी मराठा चे संपादन केले.नंतर मात्र त्या दोन्ही वृत्तपत्रांचे मालकी हक्क व संपादन टिळकांच्याकडे आले.एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी उफाळून आलेल्या नव्या राष्ट्रवादाचे टिळक जणू प्रणेते होते.त्या राष्ट्रवादी चळवळीची मुखपत्रे म्हणून त्या दोन वृत्तपत्रांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे ठरले.
- १८८५ मध्ये इंडियन कॉंग्रेसची स्थापना होताच त्याचे पडसाद साहजिकच भारतीय व अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांवरही उमटले.दोन्ही वृत्तपत्रात राजकीय प्रश्नांच्या चर्चेला प्राधान्य मिळू लागले.भारतीयांनी चालविलेली वृत्तपत्रे कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाची,राजकीय आदर्शाची व कार्याची माहिती जनतेला करून देऊ लागली.
- १९०५ ते १९२० या काळात तर वृत्तपत्रे म्हणजे राजकारणाच्या क्षेत्रातील भारतीयांच्या हाती असलेले जणू शस्त्रच बनले.स्वातंत्र्याकरिता चाललेल्या राष्ट्रीय चळवळीच्या निरनिराळया बाजूंचे व मतप्रवाहांचे केवळ प्रतिबिंब त्यात उमटत होते असे नाही तर त्या वृत्तपत्रामुळे त्या चळवळीला दिशा मिळत होती.त्याबरोबरच राष्टीय आंदोलनाकडे जनमत आकृष्ट करेल असे भरपूर साहित्य ती वृत्तपत्रे लोकांच्यापुढे ठेवत असल्यामुळे ब्रिटीश काळात कधी नव्हे इतकी लोकप्रियता त्या वृत्तपत्रांना

मिळाली.उज्ज्वल देशप्रेम, अढळ ध्येयनिष्ठा, अतुल धैर्य व त्यागाची सिद्धता याकरिता नवी स्फूर्ती जणू त्या वृत्तपत्रांनी जनमानसात निर्माण केली.

- भारतीयांनी चालविलेली वृत्तपत्रे म्हणजे सरकारचे शत्रू तर ॲग्लो-इंडियन वृत्तपत्रे म्हणजे सरकारचे मित्र अशीच सरकारची भूमिका असल्याने सरकारी कृपेचे फायदे ॲग्लो-इंडियनवृत्तपत्रांना साहजिकच मिळत व त्याची भूमिका भारतीय राष्ट्रवाद व भारतीय लोक यांच्याप्रती अत्यंत सहानुभूतीशून्य व उद्दाम असे.
- नव्या शतकाच्या सुरूवातीला लॉर्ड कर्झनची साम्राज्यवादे नीती,त्याची लोकविरोधी भूमिका व त्याने केलेली बंगालची फाळणी यामुळे राष्ट्रवादाला उधाण आले.भारतीयांनी चालविलेली वृत्तपत्रे जहाल किंवा मवाळ अशा कोणत्या तरी राजकीय गटांना उघडपणे पाठिंबा देत होती.त्यामुळे त्या वृत्तपत्रांची गळचेपी करण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न सरकारने केले.१९०८ मध्ये पारित करण्यात आलेल्या वृत्तपत्रकयद्यान्वये एखादे वृत्तपत्र हत्येला,हिंसेला किंवा उठावाला प्रोत्साहन देत असल्यास किंवा तशी काही शंका आल्यास त्या वृत्तपत्राच्या प्रकाशनावर बंदी घालण्याचा,तसेच आणिबाणिच्या काळात कोनत्याही प्रकारची कारणे-दाखवा नोटीस न देताही,मुद्रणालयाची सर्व यंत्रसामुग्री जप्त करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला.सरकारच्या या दंडात्मक कार्यवाहीविरूद्ध न्यायलयात दाद मागावयाची झाल्यास त्याकरिता अर्ज उच्च न्यायालयाकडे पंधरा दिवसाच्या आत दाखल करणे आवश्यक करण्यात आले.या सरकारी रोषाच्या दंडुक्याला त्यावेळचे अनेक नामवंत वृत्तपत्रकार बळी पडले.
- वृत्तपत्रांना दडपून टाकण्याच्या दृष्टीने १९०८ च्या कायद्याची नियंत्रणे अपुऱ्या स्वरूपाची ठरत असल्याचे वाटून,भारतीय वृत्तप्त्रांचे स्वातंत्र्य अधिक सीमित करण्याच्या हेतूने,सरकारने १९१० मद्धे 'इंडियन प्रेस ॲक्ट' पास केला.त्यानुसार क्रांतिकारकांनी चालविलेल्या कार्याला अप्रत्यक्षपणे मदत करणारे,लष्करातून सैनिकांनी बाहेर पडावे असे आवाहन करणारे,क्रांतिकारंकाविरूद्ध कोणी साक्ष देऊ नये याकरिता संबंधितांवर दडपण आणणारे,संस्थानिक किंवा सरकारी अधिकारी यांवर टीका करणारे लिखाण आक्षेर्पाह ठरविण्यात आले.वृत्तपत्रातील कोणत्याही लेखामुळे या तरतुदींचा भंग होतो की नाही हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला नव्हे तर स्थानिक सरकारांना देण्यात आला.
- जालियनावाला बागेत घडलेली अमानुष घटना व पंजाबात लष्करी कायदयामुळे जनतेवर होत असलेले अत्याचार यांना वृत्तपत्राद्वारा प्रसिद्धी मिळू नये म्हणून सरकारने पंजाबचा बाहेरच्या जगाशी

संबंध तोडला होता.परंतु तरीही सरकारी रोषाची व शिक्षेची पर्वा न करता भारतीय वृत्तपत्रे निर्भयपणे त्या घटनांची मिळेल ती माहिती जनतेला देत होती व सरकारच्या जुलूमी नीतीवर कठोर टीका करीत होती.अॅग्लो-इंडियन वृत्तपत्रे मात्र जनरल डायरला त्याने केलेल्या अत्याचारांकरिता एक महान पुरूष मानून फंडाद्वारा उभारण्यात आलेल्या द्रव्याची थैली त्याला अर्पण करून त्यांचा गौरव करीत होती.

- सरकारी दडपशाहीच्या दंडुक्याखाली भरडले जात असताही १९०५ नंतर अनेक वृत्तपत्रे,नव्याने सुरू झालेली दैनिके,साप्ताहिके,मासिके जनमनात राष्ट्रीय भूमिका दृढ करण्याचे कार्य करीत होते.१९०६ मध्ये अरविंद घोष यांच्या संपादकीय नेतृत्वाखाली सुरू झालेले 'वंदे मातरम' हे त्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे.नव्याने साकार झालेल्या जहाल पक्षाचे ते मुखपत्र होते.नि:शस्त्र प्रतिकार, अहिंसात्मक असहकार व सत्याग्रह या गांधीनी नंतर भारतीय राजकारणात प्रभावीपणे वापरलेल्या शस्त्रांबाबत तात्विक चर्चा प्रथम 'वंदे मातरम' नेच केली.
- मुंबईच्या 'होमरूल'पक्षाने ''यंग इंडिया''हे साप्ताहिक सुरू केले.ते १९१९ मध्ये गांधीनी स्वत:कडे घेतले.या वृत्तपत्राला नंतरच्या काळात सर्व जगात प्रसिद्धी मिळाली.१९११ मध्ये कलकत्याहून 'कॉम्रेड'हे साप्ताहिक निघू लागले.त्या साप्ताहिकाचे संस्थापक-संपादक महंमद अली यांना १९१८ मध्ये सच्चिदानंद सिंह व दरभंग्याचे महाराज यांनी पाटण्याहून सुरू केलेले ''सर्चलाईट'' हे इंग्रजी दैनिक ही दोन्ही वृत्तपत्रे गांधीना पाठिंबा देणारी होती.
- **समारोप** - अशा अनेक वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आपली भूमिका निभावली.जुन्या वृत्तपत्रांपैकी कलकत्याहून निघणारे ''बंगाली'' व 'अमृतबजार पत्रिका' मद्रासहून 'हिंदू' व टिळकांचे 'मराठा'ही वृत्तपत्रे१९०५ ते १९२० या काळात आघाडीवर होती.त्या काळच्या अॅग्लो-इंडियन वृत्तपत्रांचा अपवाद वगळता,भारतीय वृत्तपत्रांनी अत्यंत मोलाची कामगिरी बजावली.सर्वसामान्य जनतेला राष्ट्राच्या सर्वच क्षेत्रातील बातम्या पुरविण्याचे कार्य तर त्यांनी केलेच,परंतु त्याच बरोबर परकीय सत्ताधिशांकडून होणारा अन्याय,जुलूम व शोषण याबद्दल जनमत जागृत करून राष्ट्रवादाची भावना दृढ करण्याचे व लोकमत साकार करून सामान्य जनतेला स्वातंत्र्याकरिता चाललेल्या आंदोलनात सहभागी होण्यास उद्युक्त करण्याचे बहुमोलाचे कार्य वृत्तपत्रांनी केले.या दृष्टीने राष्ट्र जीवनात त्यांनी बजावलेली भूमिका निश्चितच प्रशंसनीय ठरते.
- संदर्भसूची-

१)गर्गे,स.मा.(१९९०).भारतीय समाजविज्ञान कोश खंड ४,पुणे.

२)ग्रोवर,बी.एल व बेल्हेकर,एन के.(२००३).आधुनिक भारताचा इतिहास,नवी दिल्ली:एस चंद आणि कंपनी.

३)कुंडले,म.बा(ऑगस्ट २०१६ ते जानेवारी२०१७).शिक्षणसमीक्षा,नागपूर.

४)वैद्य,सुमन व कोठेकर,शांता(१९९६). आधुनिक भारताचा इतिहास,नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन.